# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/04/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## दुखापत

१) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत ०६ किमी अंतरावर सिल्लेवाडा कॉलनी येथे दिनांक १९/४/२०२३ चे १४/०० वा. ते १५/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– हरी जानबा शिवारे, वय ७० वर्ष, रा. कॉटर क्रमांक ३१२ सिल्लेवाडा याने **आरोपी नामे– केशवराव हरी शिवारे, रा. सिल्लेवाडा कॉटर क्रमांक ३१२** यास तू माझ्या मोटर सायकलला हात लावू नको असे म्हटले असता आरोपीने फिर्यादी सोबत झगडा भांडण करून शिवीगाळ केली व फिर्यादीचे हातातील काडी हिसकावून फिर्यादीचे उजवे हाताचे मनगटावर व कोणीवर मारून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. अमोल लोहकरे ब नं १६७३ मो. नं. ८६६८८३३४७७ हे करीत आहे.

२) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत २० किमी अंतरावर मौजा लोहारी सावंगा येथे दिनांक १८/०४/२०२३ चे १७/०० वा. ते १७/३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– गंगाबाई महादेवराव डाबरे, वय ७० वर्ष, रा. लोहारी सांवगा ता. नरखेड व **आरोपी नामे– चंदु उंकडराव काचोळे, रा. लोहारी सांवगा ता. नरखेड** हा सख्या बहीणीचा मुलगा असुन एकाच घरी राहतात घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी तिची बहीण ३० वर्षा पासुन तिची बहीण सावित्री उंकडराव काचोळे हिच्या जवळ राहत असुन फिर्यादी व फिर्यादीची बहीण घरी हजर असता आरोपी हा दारु पिवुन आला व शिवीगाळी करु लागला म्हणुन फिर्यादीची बहीण तेथुन निघुन गेली व फिर्यादी ही स्वत:च्या बकऱ्या बांधीत असता आरोपी फिर्यादीला म्हणाला की, तु बकऱ्या कशाला बांधते असे म्हणुन फिर्यादी सोबत झगडा भांडण करुन शिवीगाळी केली व काडीने डाव्या डोळयाच्या कपाळावर मारल्याने तिचे डोके फुटुन रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा तायडे ब. नं. १९४६ पो.स्टे. जलालखेडा मो हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर